# THE GREATER BOMBAY LAWS AND THE BOMBAY HIGH COURT (DECLARATION OF LIMITS) ACT, 1945.

(Bom. XVII of 1945.)

## बृहन्मुंबईच्या विधींबाबत व मुंबई उच्च न्यायालयाच्या हद्दी जाहीर करण्याबाबत अधिनियम, १९४५.

---

### अनुक्रमणिका.


प्रस्तावना.

| | पान. |
|---|---|
| कलमें. | |
| १. लघुसंज्ञा व सुरुवात ... ... ... | ६८३ |
| २. व्याख्या ... ... ... | ६८३ |
| ३. अधिनियम बृहन्मुंबईस लागू करणें ... ... ... | ६८४ |
| ४. समाविष्ट क्षेत्रांत कांहीं अधिनियम अंमलांत नसणें ... ... ... | ६८४ |
| ४-अ. कांहीं गांवांच्या हद्दींत फेरबदल ... ... ... | ६८४ |
| ५. उच्च न्यायालयाच्या क्षेत्राधिकाराच्या हद्दी जाहीर करणें ... ... | ६८५ |
| ६. अनिर्णित कामें ... ... ... | ६८५ |
| ७. अनुसूचि अ व क मधील नोंदींची सुधारणा ... ... ... | ६८५ |
| ८. विवक्षित बाबींसंबंधींच्या केंद्रीय अधिनियमांतील व्याख्या ... ... | ६८६ |
| ९. विवक्षित अधिनियमांची सुधारणा ... ... ... | ६८६ |

अनुसूचि अ ते फ.

# सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७.

[बृहन्मुंबईच्या विधींबाबत व मुंबई उच्च न्यायालयाच्या हद्दी जाहीर करण्याबाबत अधिनियम, १९४५.]

[१५ ऑगस्ट १९४५.]

ह्या अधिनियमांत पुढील आदेश व अधिनियम यांअन्वयें अनुकलन, रूपभेद व सुधारणा करण्यांत आल्या आहेत :—

सन १९४७चा मुंबई अधिनियम ५२.

सन १९५०चा मुंबई अधिनियम ८.

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

ज्याअर्थी, मुंबई शहराच्या हद्दी त्यांत मुंबई उपनगर जिल्ह्याचा कांहीं भाग समाविष्ट करून वाढविणें इष्ट आहे ; आणि ज्याअर्थी, सबंध उक्त क्षेत्राचें, ज्यास यांत यापुढें बृहन्मुंबई म्हटलें आहे असें क्षेत्र बनविणें आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या तारीख २८ माहे डिसेंबर सन १८६५ रोजींच्या लेटर्स पेटंटची कंडिका ११ हींत अशी तरतूद केली आहे कीं, उक्त उच्च न्यायालयास मुंबईचे गव्हर्नर-इन्-कौन्सिल यांनीं केलेल्या कोणत्याहि विधिअन्वयें वेळोवेळीं जाहीर करण्यांत व विहित करण्यांत येतील अशा स्थानिक हद्दींत सामान्य प्रारंभिक दिवाणी क्षेत्राधिकार असेल व अशा हद्दींत तें असा क्षेत्राधिकार चालवील ; आणि ज्याअर्थी, भारत शासन अधिनियम, १९३५ अन्वयें मुंबईच्या प्रांतिक विधानमंडळास अशा क्षेत्राधिकाराच्या स्थानिक हद्दी जाहीर करण्याचा व विहित करण्याचा अधिकार आहे ;

आणि ज्याअर्थी, मुंबईचे गव्हर्नर यांनीं भारत शासन अधिनियम, १९३५, कलम ९३ अन्वयें काढलेल्या तारीख ४ माहे नोव्हेंबर सन १९३९ रोजींच्या उद्घोषणेद्वारें उक्त अधिनियमाअन्वयें किंवा तदनुसार प्रांतिक विधानमंडळाकडे असलेले सर्व अधिकार आपणाकडे घेतले आहेत ;

त्याअर्थी, आतां, उक्त अधिकार चालवून मुंबईचे गव्हर्नर यांनीं पुढीलप्रमाणें अधिनियम केला आहे :—

१. (१) ह्या अधिनियमास बृहन्मुंबईच्या विधींबाबत व मुंबई उच्च न्यायालयाच्या हद्दी जाहीर करण्याबाबत अधिनियम, १९४५ असें म्हणावें. लघुसंज्ञा व सुरुवात.

(२) तो, राज्य सरकार राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें जी तारीख नेमील त्या तारखेस अंमलांत येईल.

२. ह्या अधिनियमांत— व्याख्या.

(१) "मुंबई शहर" या संज्ञेचा अर्थ, ह्या अधिनियमाच्या सुरुवातीच्या निकटपूर्वी उच्च न्यायालयाच्या सामान्य प्रारंभिक दिवाणी क्षेत्राधिकाराच्या ज्या स्थानिक हद्दी होत्या त्या हद्दींतील क्षेत्र असा समजावा ;

(२) "बृहन्मुंबई" या संज्ञेचा अर्थ, अनुसूचि अ मध्यें त्या त्या वेळीं निर्दिष्ट केलेलें क्षेत्र असा समजावा ;

(३) "उच्च न्यायालय" म्हणजे मुंबई येथील उच्च न्यायाधिकरण ;

(४) "लेटर्स पेटंट" या संज्ञेचा अर्थ, उच्च न्यायालयाचे तारीख २८ माहे डिसेंबर सन १८६५ रोजींचे लेटर्स पेटंट असा समजावा ;

(५) "अनुसूचि" म्हणजे ह्या अधिनियमास जोडलेली अनुसूचि.

अधिनियम बृहन्मुंबईस लागू करणें.

३. (१) मुंबई शहर (मग त्याचें वर्णन मुंबई शहर, मुंबई टाऊन, मुंबई टाऊन व बेट, मुंबई व कुलाबा बेटें, इलाखा शहर, मुंबईचें इलाखा शहर, मुंबईचें कलेक्टोरेट या नांवानें केलेलें असो किंवा इतर प्रकारें केलेलें असो) यांत समाविष्ट केलेल्या क्षेत्रांत, ह्या अधिनियमाच्या सुरुवातीच्या निकटपूर्वी अंमलांत असलेले परंतु बृहन्मुंबईत समाविष्ट केलेल्या इतर क्षेत्रांत अंमलांत नसलेले—

(अ) भारत शासन अधिनियम, १९३५ याच्या सातव्या अनुसूचींतील सूचि २ व ३ ह्यांत सांगितलेल्या कोणत्याहि बाबींसंबंधानें ब्रिटिश इंडियांतील कोणत्याहि प्राधिकाऱ्यानें केलेल्या कोणत्याहि अधिनियमाचे उपबंध किंवा उपबंधाचे भाग, अथवा

(ब) कंडिका अ मध्यें उल्लेख केलेल्या वर्गांतील कोणत्याहि अधिनियमाअन्वयें काढलेल्या कोणत्याहि अधिसूचनेचे किंवा दिलेल्या कोणत्याहि आदेशाचे, किंवा विहित केलेल्या कोणत्याहि योजनेचे, नियमाचे, नमुन्याचे किंवा उपविधीचे उपबंध किंवा उपबंधांचे भाग

हे, बृहन्मुंबईत समाविष्ट केलेल्या सर्व क्षेत्रांत अंमलांत आले आहेत असें याअन्वयें जाहीर करण्यांत येत आहे ; आणि असे अधिनियम, अधिसूचना, आदेश, योजना, नियम, नमुना आणि उपविधि यांच्या उक्त उपबंधांतील उक्त शहरासंबंधींचे—मग त्याचें वर्णन कोणत्याहि रीतीनें केलेलें असो—सर्व उल्लेख हे बृहन्मुंबईसंबंधींचे उल्लेख आहेत असें समजलें पाहिजे.

(२) पोट-कलम (१) मधील कोणताहि उपबंध—

(अ) अनुसूचि ब व अनुसूचि क मध्यें निर्दिष्ट केलेल्या अधिनियमांअन्वयें किंवा तदनुसार केलेल्या कोणत्याहि उपबंधास लागू असणार नाहींत ;

(ब) पोट-कलम (१) मध्यें उल्लेख केलेला कोणताहि अधिनियम, अधिसूचना, आदेश, योजना, नियम, नमुना किंवा उपविधि रद्द करण्याचा किंवा सुधारण्याचा कोणत्याहि सक्षम प्राधिकाऱ्यास जो अधिकार असेल त्यास बाध आणणार नाहीं.

समाविष्ट क्षेत्रांत कांहीं अधिनियम अंमलांत नसणें.

४. (१) अनुसूचि ड मध्यें निर्दिष्ट केलेले अधिनियम व त्याअन्वयें काढलेल्या सर्व अधिसूचना दिलेले सर्व आदेश व विहित केलेल्या सर्व योजना, नियम, नमुने व उपविधि हे, अनुसूचि अ चे भाग २ व ३ यांत निर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांत लागू असण्याचें किंवा अंमलांत असण्याचें बंद होईल.

(२) पोट-कलम (१) मधील कोणत्याहि उपबंधामुळें पुढील गोष्टींस बाध येणार नाहीं :—

(अ) उक्त पोट-कलमांत उल्लेख केलेला कोणताहि अधिनियम, अधिसूचना, आदेश, योजना, नियम, नमुना किंवा उपविधि उक्त पोट-कलमांत उल्लेख केलेल्या क्षेत्रांत लागू असेल किंवा अंमलांत येईल असा निदेश देण्याचा किंवा कोणत्याहि अशा अधिनियमांअन्वयें कोणतीहि अधिसूचना काढण्याचा, कोणताहि आदेश देण्याचा किंवा कोणतीहि योजना, नियम, नमुना किंवा उपविधि विहित करण्याचा कोणत्याहि सक्षम प्राधिकाऱ्याचा अधिकार ; अथवा

(ब) ह्या अधिनियमाच्या सुरुवातीपूर्वी असलेला कोणत्याहि अशा अधिनियमांचा, अधिसूचनेचा, आदेशाचा, योजनेचा, नियमाचा, नमुन्याचा किंवा उपविधीचा अंमल ; अथवा

(क) ह्या अधिनियमाच्या सुरुवातीपूर्वी कोणताहि असा अधिनियम, अधिसूचना, आदेश, योजना, नियम, नमुना किंवा उपविधि यांअन्वयें संपादन केलेला, प्राप्त झालेला किंवा पत्करलेला कोणताहि हक्क, विशेष अधिकार, बंधन किंवा जबाबदारी.

कांहीं गांवांच्या हद्दींत फेरबदल.

४-अ. मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९ आणि तदन्वयें दिलेला कोणताहि आदेश किंवा काढलेली कोणतीहि अधिसूचना हींत कांहींहि असलें तरी,—

(अ) अनुसूचि ई च्या भाग १ मध्यें निर्दिष्ट केलेल्या जमिनी, बृहन्मुंबईच्या विर्धीबाबत व मुंबई उच्च न्यायालयाच्या हद्दी जाहीर करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९५० अंमलांत येण्याच्या तारखेस व तारखेपासून मुंबई उपनगर जिल्ह्यांतील माजस गांवाच्या हद्दींतून वगळण्यांत येतील व त्या गोरेगांव गांवांत समाविष्ट होऊन त्याचा भाग म्हणून समजण्यांत येतील ;

(ब) उक्त अनुसूचीच्या भाग २ मध्यें निर्दिष्ट केलेल्या जमिनी, उक्त तारखेस व उक्त तारखेपासून मुंबई उपनगर जिल्ह्यांतील मरोळ गांवाच्या हद्दींतून वगळण्यांत येतील व त्या पारजापूर गांवांत समाविष्ट होऊन त्याचा भाग म्हणून समजण्यांत येतील ;

(क) उक्त अनुसूचीच्या भाग ३ मध्यें निर्दिष्ट केलेल्या जमिनी, उक्त तारखेस व उक्त तारखेपासून मुंबई उपनगर जिल्ह्यांतील मरोळ गांवाच्या हद्दींतून वगळण्यांत येतील व त्यांचें मरोशी या नांवाचें नवीन गांव बनविण्यांत येईल.

उच्च न्यायालयाच्या क्षेत्राधिकाराच्या हद्दी जाहीर करणें.

५. (१) उच्च न्यायालयास, बृहन्मुंबईंत त्या त्या वेळीं समाविष्ट केलेल्या क्षेत्रांत सामान्य प्रारंभिक दिवाणी क्षेत्राधिकार असेल व तें असा क्षेत्राधिकार चालवील.

(२) ह्या अधिनियमांत अन्यथा जी तरतूद केली असेल ती खेरीज करून, पोट कलम (१) मधील कोणत्याहि उपबंधामुळें—

(अ) लेटर्स पेटंट्च्या कंडिका ३२ व ३३ अन्वयें किंवा जल-प्रांगण क्षेत्राधिकार अधिनियम, १८७८ (टेरिटोरिअल वॉटर्स ज्युरिसडिक्शन् ॲक्ट, १८७८) अन्वयें उच्च न्यायालयास ॲड्मिरॅल्टी न्यायालय किंवा व्हाईस-ॲड्मिरॅल्टी न्यायालय म्हणून उच्च न्यायालयाचा जो क्षेत्राधिकार असेल त्यास किंवा युद्धसंपादित धनासंबंधीं किंवा भारतांत उद्भवणाऱ्या इतर समुद्रविषयक प्रश्नासंबंधीं उच्च न्यायालयास अन्य रीतीनें जो क्षेत्राधिकार चालवितां येईल त्यास बाध येणार नाहीं ;

(ब) क्षेत्राधिकार चालविण्याबाबत व त्यापासून उद्भवणारे कोणतेहि वध परिणाम याबाबत ज असेल तें खेरीज करून कोणत्याहि सरकारचा, किंवा कोणत्याहि स्थानिक प्राधिकाऱ्याचा किंवा इसमाचा जो कोणताहि हक्क किंवा जबाबदारी असेल तीस बाध येणार नाहीं.

अनिर्णित कामें.

६. ह्या अधिनियमांत कांहींहि असलें तरी, अनुसूचि अ चे भाग १ व २ यांत निर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांतील कोणत्याहि न्यायालयांत, ह्या अधिनियमाच्या सुरुवातीच्या तारखेस अनिर्णित असलेलीं सर्व कामें आणि कोणत्याहि सरकारी अधिकाऱ्यापुढें उक्त तारखेस अनिर्णित असलेलीं कोणत्याहि स्वरूपाचीं इतर सर्व कामें (यांत ज्या कामांत दिलेल्या किंवा द्यावयाच्या निर्णयावर अपील किंवा फेरतपासणी अर्ज करतां येतो किंवा करतां येईल त्या कामांचाहि समावेश होतो), जर अशीं इतर कामें अनुसूचि अ चे भाग १ व २ यांत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि क्षेत्रांत अनिर्णित असतील किंवा कोणत्याहि अशा क्षेत्राच्या संबंधांत अनिर्णित असतील तर, राज्य सरकार निदेश देईल अशा प्राधिकाऱ्याकडून निकालांत काढण्यांत यतील आणि असा निदेश दिलेला नसल्यास, कोणतेंहि असें काम, जणूं हा अधिनियम संमत झाला नव्हता असें समजून चालू ठेवण्यांत व निकालांत काढण्यांत येईल.

अनुसूचि अ व क मधील नोंदींची सुधारणा.

७. (१) राज्य सरकारास, वेळोवेळीं, उच्च न्यायालयाची संमति घेऊन, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें, (समुद्र हटवून) जमीन काढणें, समुद्राचें अतिक्रमण, जलप्रवाहाचें निमज्जन किंवा समुद्राच्या हद्दींतील इतर फेरबदल यांमुळें, जेथवर आवश्यक असेल तेथवर, अनुसूचि अ मध्यें जादा नोंदी दाखल करण्याचा किंवा अशा अनुसूचींतील नोंदींत फेरबदल करण्याचा किंवा त्या सुधारण्याचा किंवा अशा अनुसूचींतील चुका सुधारण्याचा अधिकार आहे ; आणि अशी अधिसूचना काढण्यांत आल्यावर उक्त अनुसूचि त्याप्रमाणें सुधारण्यांत आली आहे असें समजलें पाहिजे.

(२) राज्य सरकारास, वेळोवेळीं, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें, अनुसूचि क मध्यें जादा नोंदी दाखल करण्याचा किंवा अशा अनुसूचींतील नोंदींत फेरबदल करण्याचा किंवा त्या सुधारण्याचा अधिकार आहे ; आणि अशी अधिसूचना काढण्यांत आल्यावर उक्त अनुसूचि त्याप्रमाणें सुधारण्यांत आली आहे असें समजलें पाहिजे.

विवक्षित बाबींसंबंधीच्या केंद्रीय अधिनियमांतील व्याख्या.

८. विषयांत किंवा संदर्भात एतद्विरुद्ध कांहीं नसल्यास, भारत शासन अधिनियम, १९३५ याच्या सातव्या अनुसूचींतील सूचि २ व ३ यांत सांगितलेल्या कोणत्याहि बाबींसंबंधीं ह्या अधिनियमाच्या सुरुवातीपूर्वी संमत केलेले सर्व केंद्रीय अधिनियम व विनियम यांत—

(१) "मुंबई शहर" या संज्ञेचा अर्थ, ह्या अधिनियमाच्या सुरुवातीच्या निकटपूर्वी उच्च न्यायालयाच्या सामान्य प्रारंभिक दिवाणी क्षेत्राधिकाराच्या स्थानिक हद्दींत जें क्षेत्र होतें तें क्षेत्र असा समजावा ;

(२) "मुंबईचें इलाखा शहर", "मुंबई टाऊन", "मुंबई टाऊन व बेट" व "इलाखा शहर" ह्या संज्ञा मुंबई प्रांतास किंवा बृहन्मुंबईस अनुलक्षून वापरण्यांत येतील तेव्हां, त्यांचा अर्थ अनुसूचि अ मध्यें त्या त्या वेळीं निर्दिष्ट केलेलीं क्षेत्रें असा समजावा.

विवक्षित अधिनियमांची सुधारणा.

९. अनुसूचि फ च्या दुसऱ्या आसनांत निर्दिष्ट केलेलें अधिनियम हे, उक्त अनुसूचीच्या तिसऱ्या आसनांत निर्दिष्ट केलेल्या रीतीनें व मर्यादेपर्यंत सुधारण्यांत येतील.

## अनुसूचि अ.

### बृहन्मुंबईंत समाविष्ट केलेलीं क्षेत्रें.

[कलम २(२) पहा.]

### भाग १.

१. मुंबई टाऊन व बेट.

२. भारतीय पत्तन अधिनियम, १९०८, कलम ५ अन्वयें काढलेली तारीख ६ माहे जून सन १९३० रोजींची राजनैतिक विभागांतील सरकारी अधिसूचना क्रमांक ६२०४ हींत व्याख्या केल्याप्रमाणें असलेल्या मुंबई बंदराच्या हद्दी.

### भाग २.

१. वांद्रें, पार्ले-अंधेरी आणि कुर्लें नगरपालिका बरोंच्या हद्दी आणि घाटकोपर-किरोळ व जुहू नगरपालिका जिल्ह्यांच्या हद्दी.

२. मुंबई उपनगर जिल्ह्यांतील खालीं दिलेलीं २८ गांवें :—

(१) बांदिवली.
(२) चेंबूर.
(३) वाडवली.
(४) आंबिवली.
(५) चाकाळा.
(६) तुंर्भे.
(७) बापनाळा.
(८) ब्राम्हणवाडा.
(९) मांडाळा.
(१०) मानखुर्द.
(११) मान बुद्रुक.
(१२) मुळगांव.

(१३) वेसावें.
(१४) मढ.
(१५) देवनार.
(१६) बोर्ले.
(१७) माहुल.
(१८) आणिक.
(१९) कोळे-कल्याण.
(२०) मरोळ.
(२१) मोहिली.
(२२) मारवली.
(२३) मोगरें.
(२४) शहार.
(२५) नाताळा.
(२६) साकी.
(२७) आसल्पें (अस्पें).
(२८) कोंदिवटें.

## भाग ३.

मुंबई उपनगर जिल्ह्यांतील पुढील गांवें :—

१. भांडुप.
२. चेंदवली.
३. हरीआळी.
४. कांजूर.
५. कोपरी (पवई जवळील).
६. माजस (ह्या अधिनियमाच्या कलम ४-अ अन्वयें रचना केल्याप्रमाणें असलेलें.)
७. ओशिवरें.
८. पारजपूर (ह्या अधिनियमाचें कलम ४-अ अन्वयें रचना केल्याप्रमाणें असलेलें )
९. पासपोली.
१०. पवई.
११. तिरंदाज.
१२. तुंगवें.
१३. विक्रोळी.
१४. व्यारोळी.

---

टीपः—बृहन्मुंबईत समाविष्ट केलेल्या वरील क्षेत्रांच्या हद्दी ह्या सरकारचे सचिव, गृहविभाग यांनीं सही केलेल्या तीन रेखाचित्रांत जांभळ्या रेषेनें दर्शविल्या आहेत. या तीन रेखाचित्रांपैकीं एक उच्च न्यायालयाचे प्रोथोनोटरी यांजपाशीं, एक बृहन्मुंबईचे म्युनिसिपल कमिशनर यांजपाशीं आणि एक सरकारचे सचिव, गृहविभाग यांजपाशीं ठेवलें आहेत.

## अनुसूचि ब.

ह्या अधिनियमामुळें ज्यांस बाध येणार नाहीं असे अधिनियम.

[कलम ३ (२) पहा.]

| वर्ष. 1 | क्रमांक. 2 | लघुसंज्ञा. 3 |
|---|---|---|
| | | मुंबई अधिनियम. |
| १८७६ | २ | मुंबई शहर जमीन महसूल अधिनियम, १८७६. |
| १८९८ | १ | मुंबई शहर नगरपालिकेचे पैसे गुंतविण्याबाबत अधिनियम, १८९८. |
| १९१५ | ४ | मुंबई शहर भूमापन अधिनियम, १९१५. |

## अनुसूचि क.

ह्या अधिनियमामुळें ज्यांस बाध येणार नाहीं असे अधिनियम.

[कलम ३ (२) पहा.]

| वर्ष 1 | क्रमांक. 2 | लघुसंज्ञा. 3 |
|---|---|---|
| | | केंद्रीय अधिनियम. |
| १८९९ | २ | भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९. |
| | | मुंबई अधिनियम. |
| १९२५ | ६ | मुंबई पण कर अधिनियम, १९२५. |
| १९२५ | ८ | मुंबई तारणपत्र करार नियंत्रण अधिनियम, १९२५. |
| १९२९ | ७ | मुंबई प्रसूतिसाहाय्य अधिनियम, १९२९. |
| १९३२ | २ | मुंबई वित्त अधिनियम, १९३२. |
| १९३२ | १५ | मुंबई वजनें व मापें अधिनियम, १९३२. |
| | | सर्व केंद्रीय अध्यादेश. |

## अनुसूचि ड.

जें अधिनियम अनुसूचि अ, भाग २ मध्यें निर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांस लागू असण्याचे किंवा त्यांत अंमलांत असण्याचें बंद होईल असे अधिनियम.

[ कलम ४ (१) पहा. ]

| वर्ष. १ | क्रमांक. २ | लघुसंज्ञा. ३ |
|---|---|---|
| | | **केंद्रीय अधिनियम.** |
| १८६९ | १४ | मुंबई दिवाणी न्यायालय अधिनियम, १८६९. |
| १८७१ | १ | गुरांच्या अतिक्रमणाबाबत अधिनियम, १८७१. |
| १८८७ | ९ | प्रांतिक लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८७. |
| १९२० | ५ | प्रांतिक नादारी अधिनियम, १९२०. |
| | | **मुंबई अधिनियम.** |
| १८६७ | ७ | मुंबई जिल्हा पोलीस अधिनियम, १८६७. |
| १८८९ | १ | मुंबई ग्राम आरोग्यरक्षण अधिनियम, १८८९. |
| १८९० | ४ | मुंबई जिल्हा पोलीस अधिनियम, १८९०. |
| १८९२ | १ | मुंबईंचा जिल्ह्यांत देवी टोंचण्याबाबत अधिनियम, १८९२. |
| १९०५ | १ | मुंबई प्रतिपालक अधिकरण अधिनियम, १९०५. |
| १९०६ | २ | मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६. |
| १९३० | २५ | मुंबई स्थानिक निधि हिशोब तपासणी अधिनियम, १९३०. |

## अनुसूचि ई.

[ कलम ४-अ पहा. ]

### जमिनी.

### भाग १.

| भूमापन क्रमांक. | हिस्सा क्रमांक. | क्षेत्र. एकर | गुंठे | आणे |
|---|---|---|---|---|
| १३ | २ भाग | ० | ३६ | ० |
| १५ | ... | १ | २५ | ४ |
| १६ | १ | ४ | ८ | ० |

| भूमापन क्रमांक. | हिस्सा क्रमांक. | क्षेत्र. | | |
|---|---|---|---|---|
| | | एकर | गुंठे | आणे |
| १६ | २ भाग. | ३४ | ३२ | ० |
| १७ | ... | ५ | ० | ० |
| १८ | ... | ३ | १८ | ४ |
| १९ | १ | ७० | ३६ | ० |
| १९ | २ | ० | ११ | ० |
| २० | ... | १ | ० | १२ |
| २१ | ... | १ | ११ | १२ |
| २२ | ... | १ | ९ | ४ |
| २३ | ... | ६० | २० | ० |
| २४ | ... | ५ | १५ | ० |
| २५ | ... | ० | ९ | ४ |
| २६ | ... | ५ | २९ | ० |
| २७ | ... | ५८ | ८ | ० |
| २८ | १ | ६ | ३८ | ० |
| २८ | २ | ४२ | २४ | ० |
| २९ | ... | १ | १४ | ० |
| ३० | ... | ३ | १ | ४ |
| ३१ भाग | ... | ३ | २१ | ० |
| ३२ भाग | ... | ० | ५ | ० |
| ३४ | १ भाग | ३ | ३८ | ० |
| ३५ | ... | २ | ३४ | ० |
| ३६ | ... | ० | ६ | ० |
| ४० | ३ भाग | ० | ३४ | ० |
| ४० | ४ भाग | २७ | २५ | ० |

## भाग २.

| भूमापन क्रमांक. | हिस्सा क्रमांक. | क्षेत्र. | | |
|---|---|---|---|---|
| | | एकर | गुंठे | आणे |
| १६९ भाग | ...... | १५ | ३० | ० |
| १७० भाग | ...... | ३ | ३४ | ० |
| १७१ भाग | ...... | ६ | २८ | ० |
| १७२ भाग | ...... | ९ | १५ | ० |
| १७३ | ...... | ६ | ३६ | ० |
| १७४ | ...... | २ | ५ | ० |
| १७५ | ...... | ८ | २३ | ० |
| १७६ | ...... | ६ | २३ | ० |
| १७७ | ...... | १६ | ४ | ० |
| १७८ भाग | ...... | १ | ३९ | ० |
| १९० भाग | ...... | ३० | ३० | ० |
| १९१ | ...... | २ | ७ | ८ |
| | एकूण ... | ११० | ३४ | ८ |
| | रस्ता ... | २ | १० | ० |
| | पाईप लाईन ... | ३ | ० | ० |
| | कुल एकूण ... | ११६ | ४ | ८ |

**भाग ३.**

| भूमापन क्रमांक. | हिस्सा क्रमांक. | क्षेत्र. | | |
|---|---|---|---|---|
| | | एकर | गुंठे | आणे |
| १६९ भाग | ...... | ५२१ | ० | ० |
| १७० भाग | ...... | ५ | १० | ० |
| १७१ भाग | ...... | ३ | ० | ० |
| १७२ भाग | ...... | ० | ८ | ० |
| १७८ भाग | ...... | ७ | ६ | ० |
| १७९ | ...... | ६ | १० | ० |
| १८० | ...... | ४ | १३ | ० |
| १८१ | ...... | १ | २० | ० |
| १८२ | ...... | ४ | २६ | ० |
| १८३ | ...... | ८ | २८ | ० |
| १८४ | ...... | ६ | १० | ० |
| १८५ | ...... | २० | १६ | ० |
| १८६ | ...... | ८ | २३ | ० |
| १८७ | ...... | ८ | ६ | ० |
| १८८ | ...... | ३ | १५ | ० |
| १८९ | ...... | २ | ३५ | ० |
| १९० भाग | ...... | १७५ | २१ | ० |
| | एकूण ... | ७८७ | ७ | ४ |
| | तलाव ... | १ | १० | ० |
| | पाईप लाईन ... | ३ | ७ | ० |
| | रस्ता ... | ५ | १० | ० |
| | कुल एकूण ... | ७९६ | ३४ | ४ |

# अनुसूचि फ.

(कलम ९ पहा.)

## सुधारण्यांत आलेले अधिनियम.

| क्रमांक व वर्ष. | लघुसंज्ञा. | सुधारणा. |
|---|---|---|
| सन १८६७ चा मुंबई अधिनियम ८. | मुंबई ग्राम पोलीस अधिनियम, १८६७. | कलम २३मध्यें "भाग २" या शब्दांबद्दल व आंकड्याबद्दल "भाग २ व ३" हे शब्द व आंकडे दाखल करण्यांत यावेत. |
| सन १८७७ चा मुंबई अधिनियम १. | मुंबईचा देवी टोंचण्याबाबत अधिनियम, १८७७. | १. दीर्घसंज्ञा, प्रस्तावना, कलमें १, २० व २१ मध्यें आणि कलम २०ची समासटीप यांत "मुंबई शहर" या शब्दांबद्दल "बृहन्मुंबई" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |
| | | २. कलम ३ मध्यें "मुंबई शहराची विभागणी" ह्या शब्दांबद्दल "बृहन्मुंबईची विभागणी" हे शब्द दाखल करण्यांत यावे. |
| | | ३. कलम ७ मध्यें ज्या दोन्हीं ठिकाणीं "मुंबई शहर" हे शब्द आले असतील तेथें तेथें त्या शब्दांबद्दल आणि "शहर" या शब्दाबद्दल "बृहन्मुंबई" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |
| | | ४. कलम १५ मध्यें "मुलाचा जन्म मुंबई शहराबाहेर झाला असेल तर किंवा त्याचा जन्म उक्त शहरांत नोंदला नसेल तर" या शब्दांबद्दल "मुलाचा जन्म बृहन्मुंबईत नोंदला नसेल तर" हे शब्द दाखल करण्यांत यावेत. |
| | | ५. अनुसूचि ड मध्यें "शहरांत" या शब्दांबद्दल "बृहन्मुंबईत" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |
| सन १८८९ चा मुंबई अधिनियम १. | मुंबई ग्राम आरोग्यरक्षण अधिनियम, १८८९. | कलम २ मध्यें "मुंबई शहर" या शब्दांबद्दल "बृहन्मुंबई" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |
| सन १८९० चा मुंबई अधिनियम ५. | मुंबई नगरपालिका सेवक अधिनियम, १८९०. | १. प्रस्तावनेंत, कलम (१), पोट-कलम (२)मध्यें आणि कलम ३, पोट-कलम (१), कंडिका (अ) मध्यें "मुंबई शहर" या शब्दांबद्दल "बृहन्मुंबई" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |
| | | २. कलम २, पोट-कलम (२) मध्यें "मुंबई शहराशीं संबंध असेल तेथवर" या शब्दांबद्दल "बृहन्मुंबईशीं संबंध असेल तेथवर" हे शब्द दाखल करण्यांत यावे. |
| | | ३. कलम ६ मध्यें "मुंबई शहरांत" या शब्दांबद्दल "बृहन्मुंबईत" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |

| क्रमांक व वर्ष. | लघुसंज्ञा. | सुधारणा. |
| --- | --- | --- |
| सन १८९२ चा मुंबई अधिनियम १. | मुंबईचा जिल्ह्यांत देवी टोंचण्याबाबत अधिनियम, १८९२. | कलम २, पोट-कलम (२), कंडिका (अ) मध्यें आणि कलम १७ मध्यें "मुंबई शहर" या शब्दांबद्दल "बृहन्मुंबई" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |
| सन १९०१ चा मुंबई अधिनियम ३. | मुंबई जिल्हा नगर-पालिका अधिनियम, १९०१. | १. प्रस्तावनेंत, कलम १, पोट-कलम (२) मध्यें आणि कलम ८३, पोट-कलम (२अ) मध्यें "मुंबई शहर" या शब्दांबद्दल "बृहन्मुंबई" हा शब्द दाखल करण्यांत यावा.<br><br>२. कलम २२, पोट-कलम (१) चें परंतुक गाळण्यांत यावें.<br><br>३. कलम ५६ मधील कंडिका (ह) मध्यें "किंवा यथास्थिति मुंबई शहर पोलीस अधिनियम, १९०२, कलम २९" हे शब्द व आंकडे गाळण्यांत यावे.<br><br>४. कलम ८६ मधील "बृहन्मुंबईच्या विधींबाबत व मुंबई उच्च न्यायालयाच्या हद्दी जाहीर करण्याबाबत अधिनियम, १९४५, अनुसूचि अ, भाग २ मध्यें निर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांबाबत, मुख्य प्रेसिडेन्सी न्यायाधिशाबाबत किंवा इतर क्षेत्रांबाबत" हे शब्द, कंस आणि आंकडे गाळण्यांत यावे. |
| सन १९०२ चा मुंबई अधिनियम ४. | मुंबई शहर पोलीस अधिनियम, १९०२. | १. कलम ९अ मध्यें:—<br>(अ) पोट-कलम (२) बद्दल पुढील मजकूर दाखल करण्यांत यावा:—<br>"(२) राज्य सरकारास, म्युनिसिपल कमिशनर कलेक्टर किंवा इतर कोणताहि प्राधिकारी यास, अशा जादा पोलिसांबाबत झालेला खर्च पूर्णतः किंवा अंशतः वसूल करण्यास भाग पाडण्याचा आणि जेव्हां म्युनिसिपल कमिशनर यांस असा झालेला खर्च वसूल करण्यास भाग पाडण्यांत येईल तेव्हां, अशा खर्चाच्या रकमेच्या तीन टक्क्यांहून अधिक नाहीं इतकी जादा रक्कम सामान्यतः अशी अधिसूचना ज्या क्षेत्रास लागू आहे अशा क्षेत्रांतील सर्व रहिवाशांकडून किंवा विशेषतः कोणत्याहि विशिष्ट गटाकडून किंवा गटांकडून किंवा वर्गातील इसमाकडून किंवा इसमांकडून आणि राज्य सरकार निर्दिष्ट करील अशा प्रमाणांत वसूल करण्यास भाग पाडण्याचा अधिकार आहे." |

| क्रमांक व वर्ष. | लघुसंज्ञा. | सुधारणा. |
| --- | --- | --- |
| | | (ब) पोट-कलम (४) गाळण्यांत यावें.<br>(क) पोट कलम (७) मध्यें—<br>(१) "पोट-कलम (३) किंवा (४) अन्वयें नगरपालिकेनें" हे शब्द, कंस, आंकडे याबद्दल "पोट-कलम (३) अन्वयें किंवा मुंबई शहराबाहेर असलेल्या नगरपालिकेनें बृहन्मुंबईच्या विधींबाबत व मुंबई उच्च न्यायालयाच्या हद्दी जाहीर करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९५० अंमलांत येण्यापूर्वी ह्या कलमाचे उपबंध ज्या स्वरूपांत अंमलांत होते त्या स्वरूपांतील अशा उपबंधांअन्वयें" हे शब्द, कंस व आंकडे दाखल करण्यांत यावे.<br>(२) "किंवा यथास्थिति मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम,१९०१, कलम ५१ किंवा मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५, कलम ६५" हे शब्द व आंकडे गाळण्यांत यावे.<br>२. कलम ४५मध्यें—<br>(अ) पोट-कलम (२) बद्दल पुढील मजकूर दाखल करण्यांत यावा—"मुख्य प्रेसिडेन्सी न्यायाधिशास, म्युनिसिपल कमिशनर, कलेक्टर किंवा इतर कोणताहि प्राधिकारी यास अशी रक्कम, पूर्णतः किंवा अंशतः वसूल करण्यास भाग पाडण्याचा आणि जेव्हां म्युनिसिपल कमिशनर यास अशी रक्कम वसूल करण्यास भाग पाडण्यांत येईल तेव्हां, अशा रकमेच्या तीन टक्क्यांहून अधिक नाहीं इतकी जादा रक्कम सामान्यतः कोणत्याहि विशिष्ट क्षेत्रांतील सर्व रहिवाशांकडून किंवा विशेषतः कोणत्याहि विशिष्ट गटाकडून किंवा वर्गांतील इसमाकडून किंवा इसमांकडून, मुख्य प्रेसिडेन्सी न्यायाधीश निर्दिष्ट करील अशा प्रमाणांत वसूल करण्यास भाग पाडण्याचा अधिकार आहे."<br>(ब) पोट-कलम (४) गाळण्यांत यावें.<br>(क) पोट-कलम (६) मध्यें—<br>(१) "किंवा पोट-कलम (३) किंवा (४) अन्वयें नगरपालिकेनें" हे शब्द, कंस, आणि आंकडे यांबद्दल "पोट-कलम (३) अन्वयें किंवा मुंबई शहराबाहेर असलेल्या नगरपालिकेनें बृहन्मुंबईच्या विधींबाबत व उच्च न्यायालयाच्या हद्दी जाहीर करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९५० अंमलांत येण्यापूर्वी ह्या कलमाचे उपबंध ज्या स्वरूपांत अंमलांत होते त्या स्वरूपांतील त्या उपबंधांअन्वयें" हे शब्द, कंस व आंकडे दाखल करण्यांत यावे. |

| क्रमांक व वर्ष. | लघुसंज्ञा. | सुधारणा. |
|---|---|---|
| | | (२) "किंवा यथास्थिति, मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१, कलम ५१ किंवा मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५, कलम ६५" हे शब्द व आंकडे गाळण्यांत यावे. |
| | | ३. कलम ४६, पोट-कलम (१) मध्यें "याचीं पोट-कलमें (२) ते (४)अन्वयें" हे शब्द, कंस व आंकडे गाळण्यांत यावे. |
| | | ४. कलम १११अ मध्यें "मुंबई शहराच्या किंवा बृहन्मुंबईतील कोणत्याहि इतर स्थानिक प्राधिकाऱ्याच्या" या शब्दांबद्दल "बृहन्मुंबई-च्या" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |
| सन १९१५ चा मुंबई अधिनियम १ | मुंबई नगररचना अधिनियम, १९१५. | कलम ४, पोट-कलम (१) मध्यें, कलम २०, पोट-कलम (२)मध्यें, कलम २६, पोट-कलम (१) मध्यें, कलम ४३, पोट-कलम (३) मध्यें आणि कलम ४५, पोट-कलम (३)मध्यें "मुंबई शहर" या शब्दांबद्दल "बृहन्मुंबई" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |
| सन १९२० चा मुंबई अधिनियम १५. | मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९२०. | दीर्घसंज्ञेंत, प्रस्तावनेंत, कलम १, पोट-कलम (२) मध्यें आणि कलम ३, पोट-कलम (१) मध्यें "मुंबई शहर"या शब्दांबद्दल "बृहन्मुंबई" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |
| सन १९२३ चा मुंबई अधिनियम ६. | मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३. | १. कलम १, पोट-कलम (२) मध्यें आणि कलम १०७ मध्यें "मुंबई शहर" या शब्दांबद्दल "बृहन्मुंबई" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |
| | | २. कलम १९, पोट-कलम (१)चें परंतुक गाळ-ण्यांत यावें. |
| सन १९२५ चा मुंबई अधिनियम ५. | मुंबई अपमिश्रण प्रतिबंध अधिनियम, १९२५. | १. दीर्घसंज्ञेंत, प्रस्तावनेंत, कलम १, ोट-कलम (३)मध्यें आणि कलम २, कंडिका (ब)मध्यें "मुंबई शहर" या शब्दांबद्दल "बृहन्मुंबई" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |
| | | २. कलम ६, पोट-कलम (२)मध्यें "मुंबई शहर" या दोन्हीं ठिकाणीं आलेल्या शब्दांबद्दल "बृहन्मुंबई" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |
| सन १९२५ चा मुंबई अधिनियम १८. | मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५. | १. कलम १५, पोट-कलम (१) चें परंतुक गाळण्यांत यावें. |
| | | २. कलम ७१, कंडिका (आय्) मध्यें "किंवा यथास्थिति मुंबई शहर पोलीस अधिनियम, १९०२, कलम २९" हे शब्द गाळण्यांत यावेत. |

| क्रमांक व वर्ष. | लघुसंज्ञा. | सुधारणा. |
|---|---|---|
| | | ३. कलम १०५, पोट-कलम (२) मध्यें "मुंबई शहर" या शब्दांबद्दल "बृहन्मुंबई" हा शब्द दाखल करण्यांत यावा.<br>४. कलम ११०, पोट-कलम (१) मध्यें "बृहन्मुंबईच्या विधींबाबत व मुंबई उच्च न्यायालयाच्या हद्दी जाहीर करण्याबाबत अधिनियम, १९४५, अनुसूचि अ, भाग २ मध्यें निर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांच्या बाबतींत मुख्य प्रेसिडेन्सी न्यायाधिशाच्या किंवा इतर क्षेत्रांच्या बाबतींत जिल्हा न्यायाधिशाच्या" या शब्दांबद्दल "जिल्हा न्यायाधिशाच्या" हे शब्द दाखल करण्यांत यावे.<br>५. अनुसूचि आय् मध्यें—<br>"मुंबई उपनगर" हें शीर्षक व "वांद्रें आणि कुर्ले" या नोंदी गाळण्यांत याव्या. |
| सन १९३० चा मुंबई अधिनियम २५. | मुंबई स्थानिक निधि हिशोब तपासणी अधिनियम, १९३०. | दीर्घसंज्ञेंत, प्रस्तावनेंत आणि कलम २ मध्यें "मुंबई शहर" या शब्दांबद्दल "बृहन्मुंबई" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |
| सन १९३२ चा मुंबई अधिनियम २. | मुंबई वित्त अधिनियम, १९३२. | १. कलम २० मध्यें—<br>(१) (अ) कंडिका (२) मध्यें—<br>"कुर्ले, वांद्रें" हे शब्द गाळण्यांत यावे ;<br>(ब) कंडिका (२) मध्यें—<br>"वांद्रें, पार्ले-अंधेरी, घाटकोपर-किरोळ आणि कुर्ले या नगरपालिका बरोमध्यें पूर्वी समाविष्ट केलेल्या हद्दी" हे शब्द दाखल करण्यांत यावे.<br>(२) कंडिका (३) बद्दल पुढील मजकूर दाखल करण्यांत यावा—<br>"(३) जुहू नगरपालिका जिल्ह्यांत पूर्वी समाविष्ट केलेल्या हद्दी ."<br>(३) कंडिका (४) मध्यें—<br>(अ) "चेंबूर" हा शब्द गाळण्यांत यावा;<br>(ब) कंडिका (४) मध्यें पुढील मजकूर दाखल करण्यांत यावा—<br>"चेंबूरच्या अधिसूचित क्षेत्रांत पूर्वी समाविष्ट केलेल्या हद्दी, आणि" |

| क्रमांक व वर्ष. | लघुसंज्ञा. | सुधारणा. |
| --- | --- | --- |
| | | २. कलम २१ मध्यें—<br>(१) (अ) पोट-कलम (१), कंडिका (अ) मध्यें "मुंबई शहर" या शब्दांनंतर "आणि वांद्रें, पार्ले-अंधेरी, घाटकोपर-किरोळ आणि कुर्ले या नगरपालिका बरोंमध्यें पूर्वी समाविष्ट केलेल्या हद्दींत" हे शब्द दाखल करण्यांत यावे ;<br>(२) पोट-कलम (१), कंडिका (अ) मध्यें आणि पोट-कलम (२) मध्यें—<br>"मुंबई शहर नगरपालिका अधिनियम, १८८८" हे शब्द व आंकडे याबद्दल "मुंबई महानगरपालिका अधिनियम" हे शब्द दाखल करण्यांत यावे ;<br>(३) पोट-कलम (७) मध्यें "मुंबई शहरांत मुंबई शहर नगरपालिका अधिनियम, १८८८, कलम १४३ अन्वयें बसविलेला सामान्य कर" हे शब्द व आंकडे याबद्दल "मुंबई शहरांत आणि वांद्रें, पार्ले-अंधेरी, घाटकोपर-किरोळ आणि कुर्ले या नगरपालिका बरोंमध्यें पूर्वी समाविष्ट केलेल्या हद्दींत मुंबई महानगरपालिका अधिनियम, कलम १४३ अन्वयें बसविलेला सामान्य कर" हे शब्द दाखल करण्यांत यावे.<br>३. कलम २७ मध्यें—<br>(१) पोट-कलम (१), कंडिका (अ), (ब) आणि (क) मध्यें "मुंबई शहर नगरपालिका अधिनियम, १८८८" या शब्दांबद्दल "मुंबई महानगरपालिका अधिनियम" हे शब्द दाखल करण्यांत यावें ;<br>(२) पोट-कलम (१), कंडिका (क) मध्यें "मुंबई शहराचे म्युनिसिपल कमिशनर" या शब्दांबद्दल "बृहन्मुंबईचे म्युनिसिपल कमिशनर" हे शब्द दाखल करण्यांत यावे.<br>(३) पोट-कलम (१) मध्यें आणि पोट-कलम (१-अ) मध्यें "मुंबई शहर" या शब्दांबद्दल "बृहन्मुंबई" हा शब्द दाखल करण्यांत यावा.<br>(४) पोट-कलम (१), कंडिका (क) मध्यें "मुंबई शहराची महानगरपालिका" या शब्दांबद्दल "बृहन्मुंबईची महानगरपालिका" हे शब्द दाखल करण्यांत यावे. |

| क्रमांक व वर्ष. | लघुसंज्ञा. | सुधारणा. |
| --- | --- | --- |
| सन १९३३ चा मुंबई अधिनियम ६. | मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९३३. | १. कलम २ मध्यें "मुंबई शहर" या शब्दांबद्दल "बृहन्मुंबई" हे शब्द दाखल करण्यांत यावे.<br>२. विभाग ८-अ गाळण्यांत यावा. |
| सन १९४७ चा मुंबई अधिनियम ६१. | मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७. | कलम १, पोट-कलम (२) मध्यें "मुंबई शहर" या शब्दांबद्दल "बृहन्मुंबई" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |
| सन १९४८ चा मुंबई अधिनियम ६९. | मुंबई गृहनिर्माण मंडळ अधिनियम, १९४८. | कलम ३४, पोट-कलम (१), कंडिका (अ) मध्यें "मुंबई शहर" या शब्दांबद्दल "बृहन्मुंबई" हा शब्द दाखल करण्यांत यावा. |
| सन १९४८ चा मुंबई अधिनियम ७९. | मुंबई दुकानें आणि व्यापारी संस्था अधिनियम, १९४८. | अनुसूचि १ मध्यें—<br>(अ) नोंद क्रमांक १ बद्दल पुढील मजकूर दाखल करण्यांत यावा—<br>"१. बृहन्मुंबई";<br>(ब) पुढील नोंदी गाळण्यांत याव्या—<br>"११. वांद्रें नगरपालिका क्षेत्र.<br>१२. पार्लें-अंधेरी नगरपालिका बरो.<br>१३. घाटकोपर-किरोळ नगरपालिका क्षेत्र.<br>१५. कुर्ले नगरपालिका क्षेत्र". |